जा.क्र.न्याय शाखा/१५२७/२०२५
धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
मुंबई यांचे कार्यालय
२ रा मजला, सास्मिरा इमारत,
सास्मिरा रोड, वरळी, मुंबई-४०० ०३०.
दिनांक-२५.०३.२०२५. 25 MAR 2025

| पहा - | १.महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. प्रसुधा १६१४/३४५/ प्र.क्र.७१/१८-अ, दि.०९.०३.२०१५.<br>२.महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०२५/ प्र.क्र.७/र.व.का-१, दि.१३.०१.२०२५. |
|---|---|

**परिपत्रक क्र.६७६ /२०२५, दिनांक २५.०३.२०२५**

मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी वर नमुद दिनांक १३.०१.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये क्षेत्रीय कार्यालयांसाठी १०० दिवसांचा कृती आराखडा निश्चित केलेला आहे. सदर कृती आराखड्यानुसार नागरीकांचे दैनंदिन जीवनमान सुकर व्हावे याकरीता सातत्याने प्रयत्न करावेत असे नमूद केलेले आहे. शासनाच्या वर नमुद दिनांक ०९.०३.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये सर्व शासकीय कार्यालयांत शासकीय सोयी/सुविधांकरीता शपथपत्राऐवजी स्वयंघोषणापत्र व कागदपत्रांचा स्वयंसाक्षांकित प्रती स्विकारण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. तथापि, धर्मादाय संघटनेतील काही क्षेत्रीय कार्यालयांत संस्था नोंदणी अर्जासोबत सादर करावयाचे शपथपत्र शंभर रूपयाचे स्टॅम्प पेपरवर देण्याबाबत संबंधित पक्षकार/विश्वस्तांकडे आग्रह केला जात असल्याची बाब निम्नस्वाक्षरीकार यांचे निदर्शनास आलेली आहे. करीता, संस्था नोंदणी अर्जासोबत आवश्यक असलेले शपथपत्र करण्यासाठी शंभर रूपयाचे स्टॅम्प पेपरची आवश्यकता नाही. नागरीक/विश्वस्तांनी संस्था नोंदणी अर्जासोबत साध्या कागदावर केलेले स्वयंघोषणापत्र स्विकारण्यात यावे. त्यांचेकडे विनाकारण शंभर रूपयाच्या स्टॅम्प पेपरवर शपथपत्र करून देण्याबाबत आग्रह धरू नये.

सदर परिपत्रकाचे सर्व अधिकारी व कर्मचा-यांनी काटेकोरपणे पालन करावे.

सदर परिपत्रक महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम -३ अन्वये निम्नस्वाक्षरीकारास प्रदान केलेल्या अधिकाराने जारी केलेले आहे.

25/03/25

(अमोघ श्या. कलोती)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :-
१.परिपत्रक धारिणी
२. सर्व संबंधित अधिकारी
३.संगणक शाखा(संकेतस्थळावर नोंदीसाठी)